# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

**सर्वसाधारण गट**

## श्री. यादवराव महादेव मेंढे

### मु. पो. भेंडाळा, ता. पवनी, जि. भंडारा



- धारण केलेले क्षेत्र ४.०३ हेक्टर - भात, गहू, तूर, हरभरा, सोयाबीन, हळद, मिरची इ. पिके व बांधावर पेरु, आंबा, साग, लिंब, इ. पिके.
- चारसूत्री पध्दतीने भात पिकाचे सुधारीत व संकरीत वाणांची लागवड.
- सन २००२ मध्ये मेन्थॉलची (पुदिना) लागवड तसेच ठिबक सिंचनाचा वापर करून केळी तर तुषार सिंचनाचा वापर करून मिरची व हळद या पिकांचे चांगले उत्पादन.
- गेल्या ५ वर्षापासून सेंद्रीय शेती करण्यावर भर, गांडूळ खत प्रकल्प उभारणी व शेतकरी गट तयार करून उत्पादीत सेंद्रीय भाजीपाल्याची बाजारपेठेत विक्री.
- शेततळयाची योजना राबवून साठलेल्या पाण्याचा उपयोग विहीरीचे पुनर्भरण करण्याकरीता केल्यामुळे आजूबाजूच्या २० हे. परिसरातील शेतक-यांना त्याचा फायदा.
- गावामध्ये कृषि ग्रंथालय सुरू केल्याने शेतक-यांना शेतीविषयक निरनिराळया विषयासंबंधीच्या पुस्तकांची उपलब्धता.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. नरेंद्र गंगारामजी भुसारी

### मु. पो. जांब, ता. मोहाडी, जि. भंडारा



- धारण केलेले एकत्रित कुटुंबाचे २४.३३ हेक्टर क्षेत्र, सुधारीत व संकरीत बियाण्यांचा वापर करून भात, गहू, मिरची, कोबी, फुलकोबी व इतर भाजीपाला पिकांची लागवड.
- पैकी ०.८० हे. क्षेत्रावर ऊती संवर्धित केळीची लागवड व संत्रा पिकामध्ये हळद व आले पिकाची लागवड करून चांगले उत्पादन.
- भाजीपाला पिकांचे सिंचनासाठी तुषार संचाचा वापर.
- शेतीशेजारील नाल्यावर ३ भूमीगत बंधारे तसेच २ शेततळी बांधली.
- अधिक उत्पादनाकरीता नैसर्गिक व सेंद्रीय पध्दतीने शेती, हिरवळीच्या व सेंद्रीय खतांचा जास्तीत जास्त वापर करून उत्पादन खर्चात बचत.
- गांडूळ खत व बायोगॅस प्रकल्पाची उभारणी.
- कृषिक्षेत्राबरोबरच सामाजिक कार्यातही सक्रिय सहभाग.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. जगन्नाथ गंगाराम तायडे

### मु. औरंगपूर, पो. लाडसावंगी, ता. जि. औरंगाबाद



- धारण केलेले एकूण क्षेत्र ६.५० हेक्टर, मोसंबी २ हेक्टर क्षेत्रावर व ०.८० हेक्टर क्षेत्रावर आवळा, डाळींब ही फळपिके व इतर प्रक्षेत्रावर संकरीत कापूस, बाजरी, रब्बी ज्वारी, गहू, भूईमूग या पिकांची लागवड.
- स्वतःची कोरडवाहू जमिन पाण्याखाली आणण्यासाठी २०० फूट बाय ३०० फूटांचे शेततळे तयार करुन ७००० फूट लांबीच्या पाईपलाईनद्वारे शेती ओलिताखाली तसेच ४.८० हे. क्षेत्रावर ठिबक संच व १.०० हे. क्षेत्रावर तुषार संचाचा सिंचनासाठी वापर.
- शेडनेट उभारुन ढोबळी मिरचीची लागवड व १० गुंठे क्षेत्रावर टरबुजाची लागवड करुन उत्तम उत्पादन.
- शेतात स्वतंत्र गांडूळ खत व गोबर गॅस प्रकल्प उभारणी.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्री. सुनील उर्फ युवराज भानुदास पाटील

### मु. पो. आरवडे, ता. तासगाव, जि. सांगली



- एकूण जमीनधारणा २०.९३ हेक्टर असून द्राक्ष, डाळींब, केळी, बोर, आंबा, ज्वारी, ऊस, हरभरा, गहू, या पिकांची आधुनिक पध्दतीने लागवड.
- ८० मीटर बाय ६० मीटर आकाराचे सामुदायिक शेततळे तयार केल्याने परिसरातील ७० टक्के शेतक-यांच्या द्राक्ष पिकासाठी शेततळ्याचा वापर.
- डिफ्युजर सिंचन पध्दतीचा अवलंब करुन उन्हाळयाच्या दिवसात पाण्याची ५० टक्के बचत.
- सेंद्रीय खताचा वापर करुन एकरी २८ टन द्राक्षांचे व एकरी ७ टन बेदाण्याचे उत्पादन.
- सुयोग चमन या संस्थेची स्थापना करून द्राक्षाची थेट मुंबई येथे विक्री.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून फळप्रक्रिया उद्योगांमध्ये प्रति दिवस ३ टन क्षमता असलेला टोमॅटो सॉस निर्मीती प्रकल्पाची उभारणी.
- परिसरातील शेतक-यांच्या दुधाला चांगला भाव मिळविण्यासाठी वरद मिल्क प्रोसेस प्रा. लि. ची स्थापना तसेच सन २००३ मध्ये कृषि विज्ञान मंडळ व सन २००२ मध्ये बाजार माहिती केंद्राची स्थापना.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## सर्वसाधारण गट

## श्रीमती माधुरी महादेव भोईर

### मु. पो. वेढे, ता. भिवंडी, जि. ठाणे



- एकूण क्षेत्र ३.१७ हे. त्यापैकी ०.२० हे. क्षेत्रावर आंबा तसेच चिकू, नारळा व काजू या पिकांची लागवड.
- भात पिकाच्या लागवडीसाठी संकरीत जातीचे बियाणांचा वापर.
- खरीप हंगामात कारली, दोडका, काकडी इ. भाजीपाला तर रबीमध्ये टोमॅटो, वांगी, कोबी, मिरची, मका, हरभरा, वाल, घेवडा इ. पिके.
- फुलशेतीमध्ये झेंडू पिकाची लागवड करून चांगले उत्पादन.
- तालुका पिक स्पर्धेत भात पिकांचे हेक्टरी १०५ क्विंटल उत्पादन घेवून प्रथम क्रमांक.
- गोबरगॅस व सौर ऊर्जा या अपारंपारिक ऊर्जा साधनांचा वापर.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून पत्रावळी, पापड, मिरगुंडी इत्यादी वस्तुंचे उत्पादन व विक्री.
- कृषिक्षेत्रातील योगदानाबद्दल जि.प., ठाणे यांचेमार्फत सन्मानित.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## आदिवासी गट

## श्री. दुंदा धोंडू फसाळे

### मु.अडिवली, पो.मामणोली, ता. कल्याण, जि. ठाणे



- एकूण जमीनधारणा १.११ हेक्टर, शेतीवर पोहचण्यासाठी रस्त्याची सुविधा नसूनही गेल्या वीस वर्षापासून आत्मीयतेने व निष्ठेने शेती व्यवसाय.
- दुर्गम भागातून तालुक्याच्या ठिकाणी येवून शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवून उत्पादनात वाढ.
- ओ.टी.एस.पी. योजनेअंतर्गत सिंचन विहिरीचा लाभ, पारंपारिक शेतीत सुधारणा करून विविध प्रकारच्या भाजीपाला पिके घेण्यास सुरूवात.
- भात लागवडीसाठी सुधारीत व संकरीत वाणांचा वापर करून सन १९९९-२००० मध्ये तालुका पिकस्पर्धेत प्रथम तर सन २०००-२००१ मध्ये जिल्हास्तरावर तृतीय क्रमांक.
- पडिक जमीन व शेताच्या बांधावर आंबा, काजू, शेवगा, तूर, साग व गिरीपुष्पाची लागवड.
- प्रत्येक वर्षी नाल्यावर वनराई बंधारा बांधून पाण्याचा सुयोग्य वापर.
- जोडधंदा म्हणून दुग्ध व्यवसाय, शेळीपालन व गांडूळ खत उत्पादन.
- सन २००६ मध्ये कृषिक्षेत्रातील योगदानाबद्दल जिल्हा परिषदेचा आदर्श व प्रगतीशील शेतकरी सन्मान.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

आदिवासी गट

## श्री. राघो गोविंद चौधरी

### मु. भावसे, पो.अघई, ता. शहापूर, जि. ठाणे



- एकूण जमीनधारणा ०.९९ हेक्टर, संपूर्ण क्षेत्राचे सपाटीकरण करून बांधबंदिस्ती करून कोरडवाहू क्षेत्रात आंबा व काजूची लागवड.
- शेतीलगत असलेल्या नाल्यावर छोटे माती बांध घालून पाणी अडविण्यास सुरूवात व या पाण्यावर वांगी, मिरची या भाजीपाला पिकाची लागवड.
- सन २००४ मध्ये संपूर्ण ग्रामीण योजनेंतर्गत विहीरीचा लाभ घेऊन बारमाही पाण्याची उपलब्धता.
- दरवर्षी सह्याद्री या संकरीत वाणाची चारसूत्री पध्दतीने लागवड.
- जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी रबी हंगामात कडधान्यवर्गीय भाजीपाला पिकाची फेरपालट व बांधावर गिरीपुष्प व सागाची लागवड.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून मत्स्यव्यवसाय व कुक्कुटपालन.
- सन २००४-०५ साली तालुका पातळी भात पिक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक व सन २००५ मध्ये जिल्हा परिषदेचा आदर्श शेतकरी सन्मान.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

आदिवासी गट

## श्री.प्रकाश बाबुलाल पवार

### मु. पो. ठाणेपाडा, ता. जि. नंदूरबार



- धारण केलेले एकूण क्षेत्र १०.६६ हेक्टर, सर्व क्षेत्रावर सर्वप्रथम ट्रॅक्टर केणीच्या सहाय्याने सपाटीकरण करुन बांधबंदिस्ती करून आंबा, पपई, भाजीपाला पिके, टरबूज इत्यादी पिकांची लागवड.
- परिसरात प्रथमच सिंचनासाठी ठिबक संचाचा वापर.
- इंडो अमेरिकन जातीचे टोमॅटो, कारली व वांगी या पिकांची लागवड करुन चांगले उत्पादन.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय, जाफराबादी म्हशी व जर्सी, होस्टिनफ्रिजीन जातीच्या गायी असून शेळीपालन, कुक्कुटपालन व्यवसाय प्रायोगिक तत्त्वावर सुरु.
- माती परिक्षण करुन पिकांना आवश्यक प्रमाणात रा. खतांचा वापर.
- सन २००० पासून सेंद्रीय शेती करण्यास सुरुवात व गांडूळ खत व जिवामृत खत प्रकल्प उभारणी.
- सन २००६ साली तालुका स्तरावरील पिकस्पर्धेत सहभाग घेवून ४० क्विंटल प्रती हेक्टर उत्पादन घेवून प्रथम क्रमांक.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## आदिवासी गट

## श्री. मोचडा भामटा पावरा

### मु. हरणखुरी, पो. सुरवाणी, ता. धडगाव, जि. नंदूरबार



- धारण केलेले एकूण क्षेत्र १.८७ हेक्टर, निरनिराळे प्रयोग करुन कांदा, लसूण, मिरची इत्यादी भाजीपाला पिकांची लागवड.
- बायफ या शासकीय अनुदानित संस्थेच्या मदतीने आंबा, काजू, आवळा, इ. फळपिकांची लागवड व पडिक जमिनीवर मृदसंधारण व जलसंधारणाची कामे करून निरनिराळया औषधी वनस्पतीची लागवड.
- परिसरातील शेतक-यांना भाजीपाला लागवडीसाठी प्रवृत्त करुन त्यांना प्रशिक्षणही देत आहेत.
- तालुका पातळी पिकस्पर्धेत मका व ज्वारी या पिकात प्रथम क्रमांक.
- शेतीला पूरक व्यवसाय - दुग्धव्यवसाय व ससेपालन.
- गांडूळ खत प्रकल्प व बायोगॅस प्रकल्पाची उभारणी.
- बचतगटातील महिलांना दशपर्णी, जिवामृत व फळबागेविषयी मार्गदर्शन.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## आदिवासी गट

## श्री. तुकाराम निंबाजी दिवटे

### मु. पुर, पो. चावड, ता. जुन्नर, जि. पुणे



- एकूण जमीन ४.६८ हेक्टर असून भात, गहू, हरभरा, फरशी तसेच आंबा, सिताफळ, चिकू, पपई इत्यादी पिकांची लागवड.
- पारंपारिक भात शेतीमध्ये सुधारणा करुन भाताची चारसूत्री पध्दतीने लागवड.
- भात शेतीमध्ये फुले समृध्दी या वाणाचे ०.४० हे. मध्ये २० क्विं. तर इंद्रायणी या वाणाचे १६ क्विं. उत्पादन.
- सेंद्रीय शेतीसाठी गांडूळ खत प्रकल्प उभारणी व गिरिपुष्पाची लागवड.
- जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय व गांडूळ खत प्रकल्प सुरू.
- परिसरातील शेतक-यांना सेंद्रीय शेती, हिरवळीची खते, चारसूत्री भात लागवड, जैविक खते, गांडूळ खत उत्पादन, जोडव्यवसाय इत्यादी बाबतचे मार्गदर्शन.
- कृषि विज्ञान मंडळ व सेंद्रीय भात उत्पादक गटाचे उपाध्यक्ष.

# वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००८

## आदिवासी गट

## श्री. चिंतामण मारुती हांडे

### मु.धामणगाव खुर्द, पो. शिरगाव, ता. राजगुरुनगर, जि. पुणे



- एकूण क्षेत्र १.८२ हे., पूर्वी भात व नाचणी अशी दोनच पिके.
- रो. ह. यो. अंतर्गत आंबा १.०० हे., पेरु ०.२० हे., फणस ०.१० हे., काजू ०.१० हे. लागवड तसेच हरभरा, गहू इ. पिकांची लागवड.
- भात पिकाची चारसूत्री पध्दतीने लागवड.
- आधुनिक कृषि तंत्रज्ञान व एकात्मिक किड व्यवस्थापन याचा अवलंब करून पिकांचे उत्पादन.
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन.
- परिसरातील शेतक-यांना योग्य बाजारपेठेची माहिती व्हावी व स्वतःलाही फायदा व्हावा म्हणून हंगामी फळविक्री व्यवसाय.
- उत्पादीत केलेला आंबा चांगला व चविष्ठ असल्याने तालुक्याच्या ठिकाणी 'आंबेवाले हांडे' या नावाने परिचित.